।। श्री स्वामी समर्थ ।।



# ।। स्वामींची चिलीम ।।

**श्री गणेशाय नमः**
**श्री दत्तात्रयाय नमः**
**श्री स्वामी समर्थाय नमः**
**श्री सरस्वत्यै नमः**

सुसज्ज ही चिलीम भरूनि कोळशाने धरावी ।
स्पर्शूनी स्वामी मुखास माया अन् शत्रुस ती सोडवी ।।

स्वामी ओढती तीस आनंदाने ही मस्त ।
चमत्कार हा पाहण्यासी भक्तांनी घातला गस्त ।।

माखिला हा देह स्तरांनी एकाहून एक आठ ।
सोडुनि झुरका चिलमीतून गळे ते एकापाठोपाठ ।।

कलित देहावरी चढला दर्भाचा गंज ।
हळूच सोडूनी झुरका सोडवी हा गर्वाचा पुंज ।।

हानुनी मारूनी दिखावा करी हा प्रेमाचा नविन ढंग ।
झुरका दुजा सोडोनी फिटवा लाचाळ पांग ।।

भरभरून वाहे येथे मद उन्मादाचा तो गाळ ।
तिसरा झुरका हवेत सोडोनी या बालकास सांभाळ ।।

देखवी दिखावा माझेपणाचा या रूपेरी नाटकात ।
वीर त्या अध्यात्म वासाची धमक आहे चौथ्या झुरक्यात ।।

त्रासिक देह जुनं-नविन रोगाने हा लास ।
पंचम झुरका देई स्वास्थ्य पंचभूतांचा हा खास ।।

सोडोनी लाजेची मोट मन करवी कृत्य गचाळ ।
दमदार सहावा झुरका सोडवी या विश्वातूनी हे लचाळ ।।

चोरी करोनी दावी लपोनी अगाध करीचा हा महिमा ।
सातवा झुरका दमदार असा तो सोडवील येथील गरिमा ।।



व्याकुळला जीव हा येथील दारिद्र्य ऋणाच्या खेळास ।
सोडोनी आठवा झुरका घरात नांदवी धान्य धनास ।।

आठही झुरके असे ते भक्तांसाठी मेवा प्रसाद ।
जाणती गुरुसी हे शिष्या घेऊनी तयाचा आस्वाद ।।

'भिऊ नकोस मी तुझ्या पाठीशी आहे' असेची हे आच्छादन ।
'जाणुनी हे निश्चिंत रहा' असे स्वामींचे हे वचन ।।

श्री स्वामी समर्थाऽर्पणमस्तु ।

शुभं भवतु । शुभं भवतु ।। शुभं भवतु ।।।